पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/पीएच. डी./2025/55
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : Date : -6 JAN 2025

# परिपत्रक

## पीएच.डी. पदवी व सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांकरीता

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा विसावा दीक्षांत समारंभ शुक्रवार, **दि.१०/०१/२०२५** रोजी विद्यापीठ प्रांगणात संपन्न होणार आहे.

आपण दि.१०/०१/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा. पर्यंत आपल्या बैठक व्यवस्थेबाबतची माहिती चौकशी कक्षाकडून घ्यावी व स्थानापन्न व्हावे. ज्या स्नातकांनी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी व एप्रिल/मार्च-२०२४ या परीक्षेमध्ये सर्वाधिक CGPA Score घेवुन उत्तीर्ण झाल्याबद्दल सुवर्णपदक प्राप्त केले आहे व पदवीप्रदान समारंभात पदवी व सुवर्णपदक प्राप्त करण्यासाठी **आवेदनपत्र भरलेले** व सोबत **चार Passport साईजचे फोटो व आधारकार्ड ची एक छायांकीत प्रत** आहे अशा स्नातकांना दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र व सुवर्णदपक देण्यात येणार आहे.

दीक्षांत समारंभासाठी आवश्यक असणारे दीक्षांत गणवेश (बाराबंदी व उपरणे) परिधान करणे अनिवार्य आहे. सदर गणवेशाकरिता विहीत शुल्क **रु.२५०/-** आपण भरावयाचे असून सदचे शुल्क उपरणे वितरण समितीकडे रोखीने जमा करुन दीक्षांत गणवेश उपलब्ध करुन घ्यावेत, दीक्षांत गणवेश मिळण्याची व्यवस्था उपरणे वितरण समितीद्वारे विद्यापीठातील पदार्थ विज्ञान संकुलात केलेली आहे. तसेच या विहीत शुल्कापैकी उपरणे जमा केल्यानंतर सुरक्षा रक्कम रु.२००/- हे उपरणे वितरण समितीकडून रोखीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

तसेच आपण सदर समारंभाकरीता येताना दीक्षांत समारंभासाठी आवश्यक असणारे दीक्षांत गणवेश (बाराबंदी व उपरणे) परिधान करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे **आवेदनपत्र भरलेले** व सोबत **चार Passport साईजचे फोटो व आधारकार्ड ची एक छायांकीत प्रत** फॉर्मसोबत जोडून विद्यापीठात **दि.०७/०१/२०२५** पर्यंत हस्तदेय पोहच करावे. दरम्यान होणाऱ्या दिरंगाईस विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी. दि.१०/०१/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा पर्यत रसायनशास्त्र संकुल जवळील चौकशी कक्षाकडे आपले नाव नोंदवावे व त्याच ठिकाणी आपणास बैठक व्यवस्थेबाबत माहिती देण्यात येणार आहेत. यासाठी सोबत अपले ओळखदर्शक पुरावा (मूळ) College ID Card/Driving License/Voter Id Card/PAN Card यापैकी कोणतेही एक ओळखपत्र आणणे आवश्यक असून त्याशिवाय आपले नाव नोंदविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ